# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
# कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

---

क्र.कोविमं/माध्य. परीक्षा/ 1909
दिनांक :-०६/१२/२०२१

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुख,
सातारा/सांगली/कोल्हापूर जिल्हा

**विषय :- सन २०२१ माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या मूळ प्रमाणपत्र वितरणाबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, **सन २०२१** मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस आपल्या शाळेमार्फत प्रविष्ठ होऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची खालील प्रमाणे मूळ प्रमाणपत्रे **वितरणकेंद्रा मार्फत दि. १४/ १२/२०२१ रोजी** हस्तपोहोच देण्यात येत आहेत.

**प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यानंतर करावयाची कार्यवाही**

१. **आपणास प्राप्त झालेली मूळ प्रमाणपत्रे ही आपल्याच शाळेची आहेत का याची काळजीपूर्वक खात्री करावी. जर इतर शाळेची प्रमाणपत्रे प्राप्त झाली असतील तर ती पाकिटात सिलबंद करून त्वरित मंडळ कार्यालयाकडे आपल्या विश्वासू प्रतिनिधीमार्फत समक्ष हस्तपोहोच पाठविण्याची व्यवस्था करावी.**

२. प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना हस्तपोहोच देण्यापूर्वी प्रमाणपत्राच्या पाठीमागे असलेल्या रकान्यात आपल्या शाळेचा शिक्का तथा आपली शाईची स्वाक्षरी होऊनच प्रमाणपत्र निर्गमित होईल हे कटाक्षाने पहावे. गुणपत्रिका तथा प्रमाणपत्राचा गैरवापर होऊ नये या अनुषंगाने प्रमाणपत्र प्रत्यक्ष विद्यार्थ्याचेच हाती जाईल याची दक्षता घ्यावी. प्रमाणपत्र वितरीत केल्यानंतर ते प्राप्त झाल्याबाबत प्रत्येक विद्यार्थ्याची स्वाक्षरी घेऊन सदर स्वाक्षरीची यादी तारखेसह आपल्या दप्तरी अभिलेखाच्या स्वरुपात काळजीपूर्वक जतन करुन ठेवण्यात यावी.

३. प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना हस्तपोहोच देण्यापूर्वी मा. विभागीय सचिवांची स्वाक्षरी तसेच शाळेच्या अभिलेखावरुन पडताळणी करुन जन्मतारीख, नावांतील स्पेलिंग, विषय इ. सर्व माहिती बरोबर असल्याची खातरजमा करुन त्यानंतरच विद्यार्थ्यांना देण्यात यावे. त्रुटी असणारे प्रमाणपत्र कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना देण्यात येऊ नये. प्रमाणपत्रात कोणतीही त्रुटी असल्यास तसेच प्रमाणपत्राची संख्या कमी/अधिक असल्यास विनाविलंब मंडळाशी संपर्क साधावा.

४. **त्रुटी असणारी प्रमाणपत्रे मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत मंडळाकडून दुरुस्त करुन घ्यावीत.** दुरुस्ती प्रस्तावासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे आवश्यक आहेत.

   i. प्रमाणपत्र शुल्क रु. १००/- व रु.५०/-प्रती चूक दुरुस्ती शुल्क व गुणपत्रक शुल्क रु. १००/- व रु.५०/-प्रती चूक दुरुस्ती शुल्क भरणा करणे आवश्यक आहे.

   ii. माध्यमिक शाळेच्या जनरल रजिस्टरच्या पानाची छायांकित प्रतीवर शिक्षणाधिकारी (माध्य.) यांची मूळ सही व शिक्क्याची प्रत तसेच फॉर्म नं. १ व २ (डिक्लेरेशन फॉर्म) सादर करावा.

   iii. यापूर्वी प्रिलिस्ट, प्रवेशपत्रिकेत दुरुस्ती का कळविली नाही याबाबतचा संबंधित शाळा लिपिकांनी मुख्याध्यापकांना दिलेल्या खुलाश्याची प्रत व त्याअनुषंगाने मुख्याध्यापकांनी विभागीय सचिवांच्या नावे दिलेल्या मूळ खुलाशासह मंडळ कार्यालयात प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरच दुरुस्तीची कार्यवाही केली जाईल. त्यानंतर काही त्रुटी राहिल्यास त्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**